RNI No. MAHBIL/2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक ३९] रविवार, मार्च २७, २०२२/चैत्र ६, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ९३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ मार्च, २०२२.

**आदेश**

**महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षा अधिनियम, २०१७.**

क्र. मेसमा-२०२२/प्र.क्र-४८/ऊर्जा-५.—ज्याअर्थी, विद्युत अधिनियम, २००३ (२००३ च्या ३६) खालील परवानेधारक, महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित (यापुढे ज्यास 'सदर परवानेधारक' असे संबोधण्यात आले आहे) हे महाराष्ट्र राज्यामध्ये वीज पुरवठा करण्याबाबतच्या सेवांमध्ये व्यस्त आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर परवानेधारक कंपनींचे कर्मचारी संपावर जाण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षा अधिनियम, २०१७ च्या (महाराष्ट्र २०१८ चा १८) कलम २ च्या खंड *(अ)* च्या उपखंड *(दोन)* अन्वये, वीज पुरवठयाशी संबंधित असलेली कोणतीही सेवा ही अत्यावश्यक सेवा आहे ;

आणि ज्याअर्थी, सदर परवानेधारक कंपनींच्या अत्यावश्यक सेवेमध्ये संप करण्यास प्रतिबंध करणे सार्वजनिक हितास्तव आवश्यक आहे, अशी महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे ;

त्याअर्थी आता, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षा अधिनियम, २०१७ च्या (महाराष्ट्र २०१८ चा १८) कलम ४ च्या उपकलम *(१)* यासह कलम २ च्या खंड *(अ)* च्या उपखंड *(दोन)* अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, सदर परवानेधारक कंपनींच्या अत्यावश्यक सेवेमध्ये संप करण्यास **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रामध्ये** सदर आदेश प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून प्रतिबंध करीत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रशांत पुं. बडगेरी,**
शासनाचे उप सचिव.

**INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 27th March, 2022

*ORDER*

MAHARASHTRA ESSENTIAL SERVICES MAINTENANCE ACT, 2017.

No. MESMA-2022/CR-48/Energy-5.—Whereas, the Maharashtra State Power Generation Company Limited, Maharashtra State Electricity Transmission Company Limited and Maharashtra State Electricity Distribution Company Limited (hereinafter referred to as 'the said Licensees') licensees under the Electricity Act, 2003 (36 of 2003), are engaged in the services connected with the supply of electricity in the State of Maharashtra;

And whereas, employees of the said Licensees are likely to go on strike;

And whereas, any service connected with the supply of electricity is an essential service within the meaning of sub-clause *(ii)* of clause *(a)* of section 2 of the Maharashtra Essential Services Maintenance Act, 2017 (Mah. XVIII of 2018);

And whereas, the Government of Maharashtra is satisfied that in the public interest, it is necessary to prohibit strike in the said essential service provided by the said Licensees;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 4 read with sub-clause *(ii)* of clause *(a)* of section 2 of the Maharashtra Essential Services Maintenance Act, 2017 (Mah. XVIII of 2018), the Government of Maharashtra hereby prohibits strike in the said essential service provided by the said Licensees from the date of publication of this Order in the *Maharashtra Government Gazette*.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRASHANT P. BADGERI,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.